प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CIDCO WE MAKE CITIES
सिडको
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

दिनांक 25 जुलै 2018

# सिडको अग्निशामक अधिकाऱ्यांचा ब्रिटीश फायर फायटर चॅलेंज आंतरराष्ट्रीय फायर ड्रील स्पर्धेत सहभाग

सिडको अग्निशमन दलाचे जवान इंग्लड येथे दिनांक 27 व 28 जुलै 2018 रोजी होणाऱ्या ब्रिटीश फायर फायटर चॅलेंज या आंतरराष्ट्रीय स्तरावरील फायर ड्रील स्पर्धेत सहभागी होणार असून 7 जवानांची चमू लंडनला रवाना झाली आहे. सदर स्पर्धा इंग्लडमधील आर्क शॉपिंग सेंटर, बरी सेंट एडमंड्स येथे होणार आहे. सदर स्पर्धेत भारतातून केवळ सिडको अग्निशमन दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भाग घेतला आहे.

सिडको अग्निशमन दलातील स्थानिक अधिकारी **श्री. प्रविण बाळू बोडखे** व **श्री. एस. एन. पाटील**, अग्निशामक **श्री. भीमा आप्पाराव उनवणे**, **श्री. अनंत केशव मोकाशी**, **श्री. नागेश्वर मोहन पवार**, **श्री. अक्षय दिपक साठे** व **श्री. हेमंत सदाशिव वाघमारे** यांना सिडको महामंडळातर्फे सदर स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पाठवण्यात आले आहे. सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक **श्री. लोकेश चंद्र**, मुख्य दक्षता अधिकारी **श्री. विनय कारगांवकर** व मुख्य अग्निशमन अधिकारी **श्री. अरविंद मांडके** यांनी या कर्मचारी अधिकाऱ्यांसहीत संपूर्ण अग्निशमन दलाला शुभेच्छा दिल्या आहेत. या स्पर्धेत सहभागी झाल्यामुळे सिडको महामंडळाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोचले अशी भावना श्री. लोकेश चंद्र यांच्यातर्फे व्यक्त करण्यात आली. सदर स्पर्धेसाठी केंद्र शासन व राज्य शासनातर्फे सर्व मान्यता घेण्यात आल्या आहेत.

भारतीय अग्निशमन सेवेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची व्यावसायिक व तांत्रिक गुणवत्ता वाढवून आगीमुळे होणारी मनुष्यहानी व वित्तहानी टाळणे व नागरीकांमध्ये अग्निशमनाविषयी जागरूकता आणणे हा या स्पर्धेत कर्मचारी व अधिकाऱ्यांना पाठवण्यामागचा उद्देश आहे. सदर स्पर्धेत सहभागी होणार असल्याने सिडको अग्निशमन दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य व मनोबल उंचावण्यास मदत झाली आहे. याचा सकारात्मक फायदा भविष्यात नक्कीच पहायला मिळेल.

---

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिध्दी देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**